शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा

ता. जावली, जि. सातारा

# राष्ट्रीय सेवा योजना

# विशेष शिबीर अहवाल

## २०२२ – २०२३

१. विशेष शिबिराचे ठिकाण - **गवडी, ता. जावली, जि. सातारा**

२. विशेष शिबीर दिनांक - **दि. ०४ /१२ /२०२२ ते दि. १० /१२ /२०२२**

३. विशेष शिबिराची सहभागी स्वयंसेवक संख्या - एकूण :50 (स्त्री – 29 , पुरुष: 21)

उद्घाटन समारंभ :

सन २०२२ -२३ या शैक्षणिक वर्षात राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष श्रमसंस्कार शिबीर "**युवकांचा ध्यास ग्राम-शहर विकास**" हे ब्रीदवाक्य घेऊन रविवार दि. ०४/१२/२०२२ ते शनिवार दि. १०/१२/२०२२ या कालावधीत मौजे गवडी ता. जावली जि. सातारा या ठिकाणी संपन्न झाले. या शिबिराचा उद्घाटन समारंभ शनिवार दि. ४/१२/२०२२ रोजी सकाळी ११.०० वा. संपन्न झाला. या विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन प्राचार्य मेजर डॉ. अशोक गिरी यांचे शुभहस्ते करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा.श्री. पुंडलिक पार्टे (अध्यक्ष, सरपंच परिषद जावली सातारा) हे उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमासाठी मा. श्री. बजरंग चौधरी अध्यक्ष, (जिल्हा उपाध्यक्ष, सरपंच परिषद) मा.श्री. राजाराम खुडे (सरपंच,ग्रा.पं.गवडी), मा.सौ. अलका धनावडे (उपसरपंच,ग्रा.पं.गवडी), डॉ. प्रमोद घाटगे (उप प्राचार्य) मा. श्री. रवींद्र चव्हाण (पोलीस पाटील) सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ मंडळ व नेहरू युवा मंडळाचे सर्व पदाधिकारी,महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, स्वयंसेवक उपस्थित होते.

**शिबिरातील उपक्रम :**

**१)** जि.प.प्राथमिक शाळा, गवडी व ग्रामपंचायत परिसर स्वच्छता करण्यात आला.

**२)** जि.प.प्राथमिक शाळा ते पुढील वाडी पर्यंत रस्ता व रस्त्याच्या दोन्ही बाजूकडील

गटार स्वच्छता करण्यात आली.

३) ग्रामीण रुग्णालय मेढा यांच्या सहकार्याने मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली.

४) प्लास्टिक व कचरा निर्मुलन करण्यात आले.

५) आनंद वाडी, जांभूळ वाडी रस्त्यावरील झाडे झुडपे तोडून रस्ता स्वच्छ केला

६) दत्त मंदिर परिसरातील झाडे झुडपे तोडून परिसर स्वच्छ करण्यात आला.

७) पुढील वाडी ते गवडी रस्ता व दोन्ही बाजूची गटार स्वच्छ करण्यात आले.

८) चवणेश्वर मंदिर परिसर स्वच्छ कण्यात आला.

९) गौतमनगर परिसरातील गटारे स्वच्छ करण्यात आल्या.

१०) भामघर – गवडी रस्ता लगद वेण्णा नदीवर वनराई पध्दतीचा १२०० गोण्यांचा बंधारा बाधण्यात आला.

११) पिण्याच्या पाण्याची टाकी परिसर स्वच्छ केला

१२) ग्रामस्थ व विध्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासाठी व्याख्याने आयोजित केली.

१३) हळदी – कुंकू समारंभ, सांस्कृतिक कार्यक्रम यांचेही आयोजन करण्यात आले होते.

**प्रबोधन कार्यक्रम :**

| अ.क्र. | वार /दिनांक | प्रमुख पाहुणे | विषय |
|---|---|---|---|
| १. | सोमवार ०५/१२/२०२२ | मा.श्री. राहुल ढवान (संस्थापक, आराध्य NGO फेडरेशन सातारा) | व्यक्तिमत्व विकास तारुण्यातील सामाजिक आणि वैयक्तिक जबाबदारी |
| २. | मंगळवार ०६/१२/२०२२ | मा. श्री. प्रशांत शिंदे (निवडणूक नायब तहसिलदार) | लोकशाही निवडणुकीतील मतदारांचे महत्व |
| ३. | बुधवार ०७/१२/२०२२ | मा.श्री. रंगराव जाधव सचिव सातारा जिल्हा ग्राहक पंचायत सातारा<br>मा. श्री. अमोल माने (सहा. पोलीस निरक्षक मेढा) | ग्राहकांचे हक्क व अधिकार<br>सोशल मिडिया महिलांवरील अत्य्च्यार व दक्षता |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | गुरुवार<br>०८/१२/२०२२ | मा. श्री. रमेश देशमुख<br>तालुका कृषी अधिकारी, जावली | कृषी विभगातील शाशकीय योजना आणि नोकरीच्या संधी |
| ५. | शुक्रवार<br>९/१२/२०२२ | मा. श्री. सुनील भोईटे<br>मानद वन्यजीव रक्षक वनविभाग सातारा | वनवा जाणीव जागृती |

**समारोप समारंभ :**

या विशेष श्रमसंस्कार शिबिराचा समारोप समारंभ बुधवार दिनांक १०/१२ /२०२२ रोजी सायंकाळी ४.०० वा.संपन्न झाला.समारोप समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मा.श्री.राजेंद्र पोळ (तहसिलदार जावली) हे होते. तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यलायाचे प्राचार्य मेजर डॉ. अशोक गिरी हे होते. या समारोप समारंभासाठी उप प्राचार्य डॉ.प्रमोद घाटगे, मा.श्री. राजाराम खुडे (सरपंच,ग्रा.पं.गवडी), मा.श्री.बळवंत पाडळे, मुख्याध्यापक जि. प. शाळा ओझरे, विजय सपकाळ, वैभव जाधव, दादासाहेब शिंदे विश्वस्त जयवंत प्रतिष्ठान हुमगाव, ग्रामपंचायत व मंडळाचे सर्व सदस्य, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी,ग्रामस्थ व स्वयंसेवक उपस्थित होते.या कार्यक्रमावेळी ग्रामपंचायत गवडी यांचेकडून स्वयंसेवकांना उत्कृष्ठ कामगिरी केलेबद्दल मान्यवरांचे हस्ते प्रमाणपत्र, मेडल व महाविद्यालयास सन्मानपत्र देण्यात आले.

हे शिबीर यशस्वी करण्यासाठी कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.संजय भोसले, प्रा.डॉ.उदय पवार, प्रा.डॉ.सारंगपाणि शिंदे, प्रा. धनश्री देशमुख,प्रा .प्रकाश जवळ प्राश्री.जगदीश ओंबळे, श्री.आबासाहेब देशमुख सर्व स्वयंसेवक , स्वयंसेविका व ग्रामस्थ यांनी प्रयत्न केले.